## महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

# केकावलि.

(गीति) रामघनमयूर ह्मणे, 'निववालचि सुरसिकांसि केका हो ! ।'
शंभुहि ह्मणे 'न सेविति मंद ह्मणुनि झुरसि कासिके ! कां हो ! ॥'
(वनपर्व १३.१०८)

'ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकीचा अपूर्व तो टाहो ।
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो ॥'
(बाबा पाध्ये)

(श्लोक) 'अतिचित्रकलापाढ्यः सदारामपरस्थितिः ।
कारिकाजनितानंदो मयूरेशो विराजते ॥'
(विठोबा अण्णा दप्तरदार)

---

'A true poem is a gallery of pictures.'
(Sir J. Lubbock).

सर जॉन लबक ह्मणतातः–'उत्कृष्ट काव्य ह्मणजे एक चित्रशाळाच होय.'


संशोधकः–श्रीरामदासानुदास

(प्रो॰ श्रीधर विष्णु परांजपे बी. ए.)



हें पुस्तक

पांडुरंग जावजी यांनीं

निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

सन १९२३.

पब्लिशरः-पांडुरंग जावजी. } निर्णयसागर प्रेस, मुंबई.
प्रिन्टरः-रामचंद्र येसु शेडगे. } नं. २३ कोलभाट लेन.

# मोरोपंताचें अल्पचरित्र.

'श्रीमन्मयूरकविची देते संतोष मानवां कविता; ।
असता जरि भूमिवरी सुरगुरु तरि तोहि मान वांकविता. ॥'
( मोरोपंतांचे चिरंजीव रामकृष्णपंत )

ह्या महाराष्ट्रकविवर्यांचा जन्म शके १६५१ सौम्य नांव संवत्सरीं ह्मणजे इ. स. १७२९ त कोल्हापुराजवळ पन्हाळगडीं झाला. यांच्या वडिलांचें नांव **रामजीपंत पराडकर** असून आईचें नांव **लक्ष्मीबाई** होतें. हे जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र जामदग्न्य. श्रीरामचंद्र हें पराडकरांच्या घरचें आराध्यदैवत होतें. मोरोपंतांची बुद्धि जात्याच मोठी तीव्र असून त्यांना लहानपणापासूनच पुराणकीर्तनश्रवणाची व कविता करण्याची मोठी हौस होती. केशव पाध्ये व गणेश पाध्ये यांच्याजवळ पंतांनीं काव्यनाटकव्याकरणालंकारादि विषयांचें अध्ययन केलें. त्यांनीं संस्कृत ग्रंथांबरोबर ज्ञानेश्वरी, यथार्थदीपिका, परमामृत, श्रीधरकृत हरिविजय इत्यादि महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांचेंही काळजीपूर्वक परिशीलन केलें होतें. पुढें अध्ययन संपवून चोवीस वर्षांच्या वयांत ते रसज्ञ, व्युत्पन्न, व महापंडित बनले, तेव्हां बाबूजी नाईकांच्या आश्रयास बारामतीस गेले. पुढें ते आमरण तेथेंच राहिले. बारामतीस आल्यावर त्यांनीं भारत, बृहद्दशम, मंत्रभागवत, हरिवंश, अष्टोत्तरशतरामायणें, ब्रह्मोत्तरखंड, मुक्तामाला, कृष्णस्तवराज, कुशलवचरित, केकावलि इत्यादि काव्यें रचिलीं. त्यांत कांहीं स्वतःच्या प्रेरणेवरून व कांहीं यजमानपुत्र, स्नेही इत्यादिकांच्या प्रेरणेवरून रचिलीं. त्यांनीं विविध वृत्तांत कविता केली आहे. तरी गीतिछंदांत (हिलाच पंत **आर्या** ह्मणतात) त्यांची कविता सर्वांत अधिक आहे. भारत, मंत्रभागवत, मंत्ररामायण इत्यादि बहुतेक ग्रंथांचें वृत्त **आर्याच** होय. केकावलि आर्याछंदांत असून श्लोकवृत्तांतही आहे. प्रस्तुत काव्य हें त्यांनीं श्लोकवृत्ताच्या पृथ्वीछंदांत रचिलें आहे. पंतांची काव्यरचना बहुतेक स्वतंत्रच आहे. कथानकापुरताच काय तो मूलसंस्कृत ग्रंथांचा आधार त्यांनीं घेतला असून, त्यांच्या कवितेंतील अनुप्रास, यमकें, शब्दालंकार, अर्थालंकार व उज्वल कल्पना ह्या बहुतेक सर्व खुद्द पंतांच्याच होत. त्यांची वाणी फारच सरस, व्याकरणशुद्ध व प्रौढ आहे. पंतांच्या काव्यांत शृंगारादि नवरसांचा परिपाक फार चांगला उतरला आहे. त्यांतल्या त्यांत शृंगार, वीर व करुण ह्या रसांचें वर्णन तर पंतांना अत्युत्कृष्ट साधलें आहे. भारतरामायणांतील विविध प्रसंग त्यांची उदाहरणें होत. तसेंच त्यांच्या काव्यांत प्रसंगोचित, खुबीदार व बाणेदार भाषणें, सुभाषितें व हृदयंगम वर्णनें यांचा सुकाळ आढळतो. परमार्थसाधन हें पंतांच्या काव्यरचनेच्या मूळाशीं मुख्यत्वें असल्यामुळें, त्यांच्या काव्यांत भक्तिरसाचा पाक अमृततुल्य मधुर झाला आहे. त्यांनीं कांहीं थोडी कविता संस्कृतांतही केली आहे. प्रस्तुत श्लोकबद्ध **केकावलि** काव्य हें त्यांनीं आपल्या वयाच्या अगदीं अखेरीस रचिलें. या नंतर पंतांना श्रीरामचंद्राचा सगुण साक्षात्कार झाला, अशी वृद्धपरांपरगत समजूत आहे. पंतांच्या सर्वकाव्यांत **श्लोक केकावलि** हें स्तोत्रकाव्य अत्यंत लोकप्रिय व सुप्रसिद्ध आहे. हें अत्युत्कृष्ट वठलें असून, ह्यांत त्यांच्या काव्यांतील बहुतेक सर्व उत्तम गुण–भाषाप्रौढी, अर्थप्रौढी, अलंकारवैपुल्य, खुबीदार शब्दयोजना, व्याकरणशुद्धि, सूचकपणा, ऐकांतिक भक्ति, प्रेम, प्रतिभा, प्रसाद, सुभाषितें, उत्कृष्ट नीतितत्वांचा संग्रह इत्यादि आलेले आहेत. काव्यप्रकाशकारांच्या दृष्टीनें पाहिलें असतां **केकावलि** हें सर्वोत्कृष्ट ध्वनिकाव्य आहे. स्वोद्धारार्थ आतुर झालेल्या कविच्या मानसभूमिकेंतून या स्तोत्रगंगेचा उगम होऊन ती 'गदारिदरनंदकांबुजधरा'च्या 'सदाश्रितपदा'वरून वाहात आल्यामुळें तिच्या ठिकाणीं पावनत्व, तापहारकत्व, सरसत्व,

श्रितवितृष्णत्व इत्यादि गुण सहजच प्रकट झाले आहेत. दुर्बोधत्व, यमकाधीनत्व, अप्रौढ भाषा, फाजील शृंगारवर्णन, कालविपर्यास इत्यादि दोषहि त्यांच्या काव्यांत क्वचित आढळतात. परंतु कै० मल्हार बाळकृष्ण हंस यांनीं ह्मटल्याप्रमाणें 'त्यांची प्रौढ व झोंकदार वाणी, तशाच डौलाचा आर्याछंद, अर्थगांभीर्य, यमकानुप्रासादि शब्दचमत्कृति, निवडक शब्दयोजना, प्रतिभापूरित अवाढव्य ग्रंथरचना इत्यादि काव्यगुणसूर्यरश्मीपुढें ते दोष गिरिगुहांतील अंधकारासारखे दूरच्या कोपऱ्यांत कोणाच्या दृष्टीसही न येण्यासारखे विरल आहेत.' सारांश, मोरोपंतांची एकंदर अवाढव्य काव्यरचना व त्यांतील तेजस्वी हिऱ्याप्रमाणें चमकणारे गुणगुण यांच्या मानानें हे सर्व दोष अत्यल्प असून त्यांतील गुणरत्नांचें पारडें अत्यंत जड भरत असल्यामुळें ते दोष त्यांना फारसा कमीपणा आणत नसून उलट गालबोटाप्रमाणें त्यांच्या काव्यांस शोभाच देतात. चित्रकाव्याकडेही त्यांचा ओढा फार होता. त्यांचीं बहुविध चित्ररामायणें वगैरे या गोष्टीचीं उदाहरणें होत. ते सत्संगाचे फार भुकेले होते. सुप्रसिद्ध कवि **रामजोशी बोवा** हे पंतांचे स्नेही असून, त्यांच्या आर्येचे मोठे भोक्ते होते. स्त्रीजातीसंबंधीं व जातीच्या उत्कृष्टनिष्कृष्टत्वाविषयींचे पंतांचे विचार फार थोर होते. त्यांची कविता सुमारें पाउणलाख आहे. त्यांनीं आपलें आयुष्य महाराष्ट्रकवितेची अभिवृद्धि करण्याकडे खर्च केलें व आपल्या वयाच्या ६५ व्या वर्षीं ह्मणजे शके १७१६ आनंदनाम संवत्सरीं चैत्रशुद्धपौर्णिमेस (इ. स. १७९४) त्यांनीं श्रीरामस्मरणांत आपल्या स्थूलदेहाचा त्याग करून ते रामरूपीं समरस झाले.

**काव्यवृत्तः**–पहिल्या १२१ श्लोकांचें वृत्त पृथ्वी. **लक्षणः**–'जसौ जसयला वसुग्रहयतिश्च **पृथ्वी** गुरुः ॥' ज, स, ज, स, य, हे पांच गण व लघु व गुरु अशीं शेवटचीं दोन अक्षरें, व आठव्या व नवव्या अक्षरावर यति.

सदाश्रि तपदा सदाशि वमनो विनोदा स्पदा

ज स ज स य ल ग

शेवटच्या श्लोकाचें वृत्त स्रग्धरा. **लक्षणः**–'युक्तं म्रभ्नैर्यैश्च त्रिमिस्सप्ताक्षरैस्त्रिभिः । छेदैश्च **स्रग्धरा** वृत्तमेकविंशाक्षरं विदुः ॥' म, र, भ, न, य, य, य, हे सात गण व प्रत्येक सातव्या अक्षरावर यति.

कारुण्यां भोदरो मप्रिय सखगु रुहीजो मयूरा नटाचा

म र भ न य य य

शेवटीं, पंतांनीं परमेश्वराजवळ मागितलेले पुढील वर त्यांना व वाचकांना मिळावे अशी इच्छा करून या अल्पचरित्राची येथें **इतिश्री** करितों:—

(गीति) 'भेटो रसिक, लवहि जो ग्रंथीं चषकांत नूरवि प्राशी ।
ऐसा वर दे वरदेश्वरचरणा! मज मयूरविप्राशी. ॥' (नामसुधाचषक १२०)
'श्रीरामा! नाम तुझें माझ्या वदनांत सर्वदा राहो, ।
साहो मन भोगातें, गृहचिंतेतें न हें कधीं वाहो. ॥
संताचा संग घडो, कीर्ति तुझी सर्वदा पडो कानीं, ।
भावडि फार धरावी श्रीरामा! नव गुणांचिया गानीं. ॥' (पंचवटीस्थरामप्रार्थना)
'एकांतीं स्वप्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें ।
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकांतें. ॥' (आर्याकेकावलि)

* श्रीराम जयराम जयजयराम *

# केकावलि.



(मंगलाचरणः–भगवत्पदवंदन.)

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
  स्वदासवशमानसा ! कलिर्मलांतका[१] ! कामदा ! ।
वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
  गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा. ॥ १

(पदरजवर्णन.)

पदाब्जरज जें तुझें, सकलपावनाधार तें,
  अघाचलहि तारिले बहु तुवांचि राधारतें; ।
अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा,
  अशां गति दिली; उरे न तृण भेटतां इंगळा[२]. ॥ २
तुझ्या बहुत शोधिले अघनिधी पदाच्या रजें,
  न तें अनृत, वर्णिती बुध जनीं सदाचार जें; ।
[३]असे सतत ऐकते, सतत बोलते, मीच ते
  प्रमाण न म्हणों जरी उचित माझिया नीचते. ॥ ३

---

१ पाठभेद–'कलिमदांतका !' २ पा. भे. 'विंगळा.' ३ पा. भे. 'असे शत न एक ते;' ॥ पा. भे. 'जनीं;'

( स्वोद्धारार्थ प्रार्थना. )

तमाचि उरलों कसा ? पतित मी नसें काय ? कीं
कृपाचि सरली ? असेंहि न घडे जगन्नायकीं; ।
नसेल दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवी;
विषाद धरिला म्हणों ? न सुरभी विषक्षीर वी. ॥ ४

( भगवंताचे पराक्रम. )

व्रजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा;
सलील तइं मंदराख्यहि नग स्वपृष्ठीं धरा; ।
वराहतनु घेउनी उचलिली रदाग्रें धरा;
सुदुर्धर तुम्हां कसा पतित हा ? न कां उद्धरा ? ॥ ५

( भक्तवात्सल्य. )

नतावनधृतव्रत ! ज्वलन तूंचि बाधावनीं;
पदप्रणतसंकटीं प्रजव तूंचि बा ! धावनीं; ।
दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वारणीं ?
सतीव्यसनवारणीं ? जयजयार्थ त्या वा रणीं ? ॥ ६

सुपात्र न रमाहि यद्रतिसुखास दारा परी,
असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी; ।
प्रियाकुचतटीं जिहीं न बहुवार पत्रावळी;
तिहीं अमित काढिल्या नृपमखांत पत्रावळी. ॥ ७

( सलगीचें भाषण. )

न पावसि, म्हणोनि मी म्हणतसें तुला आळशी;
बरी न असदुक्ति हे रविसखोत्थिता आळशी; ।
असंख्य जन तर्पिले, क्षुधित एकला जेमनीं
चुकेल, तरि त्यास दे, परि वदान्य लाजे मनीं. ॥ ८

( प्रार्थना. )

‘अगा ! प्रणतवत्सला !’ म्हणति त्या जनां पावलां,
म्हणोन तुमच्याच मी सरतसें सदा पावलां. ।
‘करूं बरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला.’
असें मनिं धरा, खरा भरंवसा मला आपला. ॥ ९



( गंगेचें असामर्थ्य. )

मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा
म्हणे, 'अगइ ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप' गा ! ।
कर श्रवणिं ठेविते[1], नुघडि नेत्र, घे भीतिला;
न घालिन भिडेस मी, जरिहि कार्यलोभी तिला. ॥ १०

( अन्यदेवतांचें असामर्थ्य. )

सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें,
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें;
नतां करुनि मुक्तही म्हणसि 'मी बुडालों रिणें,'
अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें ! ॥ ११

( भगवद्दर्शनार्थ प्रार्थना. )

पटुत्व सकलेंद्रियीं, मनुजता, सुवंशीं जनी,
द्विजत्वहि दिलें भलें, बहु अलभ्य जें कीं जनीं; ।
यशःश्रवणकीर्तनीं रुचि दिली; तरी हा 'वरा'
म्हणे 'अधिक द्याच कीं,' अखिल याचकीं हावरा. ॥ १२
असें न म्हणशील तूं वरद[2] वत्सल, श्रीकरा !
परंतु मज भासलें म्हणुनि जोडितों मी करा; ।
दिलें बहु बरें खरें, परि गमे कृपा व्यंग ती,
अलंकृतिमती सती मनिं झुरे, न जों संगती. ॥ १३

१ पा. भे. 'ठेवि ती', अथवा 'ठेवि ते', २ पा. भे. 'वरदवत्सल' !

कराल पुरती दया, तरि असो दिलें पावलें;
परंतु हरि ! एकदां त्वरित दाखवा पावलें; ।
प्रसाद करणें मनीं जरि नसेल, हें आवरा;
जया बहु तयास द्या, मज कशास ? मी हावरा. ॥ १४

( सलगीचें भाषण. )

'दिलें, फिरुनि घेतलें,' अशि अकीर्ति लोकीं न हो;
सुनिर्मल तुझीं पदें कधिं तरी विलोकीन, हो ! ।
निजप्रियजनाकडे तरिहि दे हवाला; जशी
पडेल समजाविशी, तशि करोत; कां लाजशी ? ॥ १५

( पश्चात्ताप. )

अहा ! निपट धृष्ट मी; प्रभुवरासि 'कां लाजशी ?'
म्हणें; तुज नसो तशी विकृति, भाविकांला जशी. ।
परंतु अपराध हा गुरु, म्हणोनि शिक्षा करीं;
असेचि धरिली नयच्युतदमार्थ दीक्षा करीं. ॥ १६

( स्वतःचें पातित्य. )

सदैव अपराध हे रचितसें असे कोटि, गा !
स्वयेंहि कथितों, नसे तिळहि लाज, मी कोटिगा; ।
अजांडशतकोटि ज्या उदरिं सर्वदा नांदवा,
न त्यांत अवकाश या ? स्थळ दिलें तदा कां दवा ? १७
तुझ्या जिरविले बहु प्रणतमंतु पोटें, पण
त्यजी मदपराध, हें मजकडेचि खोटेपण; ।
दवाग्नि जठरीं अतिक्षुधित, त्यास हें अन्न द्या;
वितृष्ण करिती श्रितां तुमचिया दयासन्नद्या. ॥ १८

( भगवंताचें पतितपावनत्व. )

न होय कवणाहि, तें तुमचियाचि लीलालसें
पदें चरित दाविजे त्रिजगदब्जकीलालसें; ।
मदुद्धरण मात्र कां जड तुम्हां दिसे ? वारिती
स्वकव्यसन मर्त्यही, न करितीच सेवा रिती. १९

( भगवत्कारुण्य. )

दयाब्द वळशील तूं, तरि न चातकां सेवकां
उणें किमपि; भाविकां उबगशील तूं देव कां ? ।
अनन्यगतिका जनां निरखितांचि सोपद्रवा,
तुझेंचि, करुणार्णवा ! मन धरी उमोप द्रवा. ॥ २०

( पापक्षालनार्थ विनंति. )


कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं;
तयांत अविशुद्ध मी, शलभ जेंवि दावानळीं; ।
व्रणार्तपशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे,
स्मरादि रिपु मन्मनीं; अहि न काळ भेका कसे ? ॥ २१
तरेन तुमच्या बळें भवमहानदी, नाविका !
तुम्हीच मग आतरास्तव मला सुदीना विका. ।
असे विदित वासही मज सदाश्रमींचा; करा
दया, गुण पहा; सवे मज सदा श्रमीं चाकरा. ॥ २२
धना, परिजना, घरीं तुमचिया उणें कायसें ?
न लाभ मणिहेमभूपतिस जोडिल्या आयसें. ।
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती;
गुणा न म्हणतां उणा, अधिक, आदरें सेविती. ॥ २३
दिसें म्हणुनि शाश्वतप्रकृतिरंक मी काय ? हो !
प्रसन्न तुमचा बरें मजवरी प्रभो ! पाय हो. ।
क्षण त्यजुनि इंदिराबृहदुरोजसंगा, धरा
शिरीं पद, मिळो सखा सम सुशील गंगाधरा. ॥ २४

( प्रभुस्तुति. )

‘प्रभुस्तुति न ठाउकी, परि तिच्या महाकामुका
मला कृपण मारितो बहु सकाम हाका मुका’ ।
म्हणा मनिं असें; कसें प्रथम नीट ये लेंकरा ?
हळहळु पडु स्वयें सुपथिं लावियेलें करा. ॥ २५

१ पा. भे. ‘व्रणार्थ पशुच्या,’

जनीं तरि असें असे, शिशुहि जे मुखें वर्ण वी,
पिता पिउनि ते भुले, मधुरता सुखें वर्णवी;
मना जरि नये, गुरूक्तहि म्हणे कटु प्रायशा;
दयानिधि! तुम्हांपुढें जनकथा अशा कायशा? ॥ २६



'अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा! हे,' विधी
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी?।
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती;
स्तवार्थ तुझिया तुझ्या सम कवी कधीं जन्मती? ॥ २७
निजस्तुति तुम्हां रुचे; स्तविति त्यां वरें तर्पितां;
नमस्कृतिपरां बरें स्वधन सर्वही अर्पितां;
स्वभाव तुमचा असा विदित जाहला याचकां;
करूं स्तव जसा तसा; फळ नव्हे जना याच कां? ॥ २८
'तुम्ही परम चांगले, बहु समर्थ, दाते; असें
सुदीन जन मी, तुम्हां शरण आजि आलों.' असें।
पुन्हाहि कथितों, बरें श्रवण हें करा यास्तव;
समक्ष किति आपुला सकललोकराया! स्तव? ॥ २९
किती श्रवण झांकिति प्रभुहि; काय ते पोळती?
पुसाल जरि कोण ते? पदरजीं तुझ्या लोळती.।

१ पा. भे. 'ह्मणतों,'

बरें तुजचि सोसवे स्तवन; कृत्तिवासा गरा
न पी, तरि कसें घडे ? हितकरा ! दयासागरा ! ॥ ३०
गमो मधुर हें विष स्तवन, सेवितां माजवी,
करी मलिन सद्यशोमुख, हलाहला लाजवी; ।
हरापरिस तूं बरा, प्रभुवरा ! सदा जो पिशी
असा रस समर्पि, त्या अमृत आपुलें ओपिशी. ॥ ३१
कवीश्वरमनःपयोनिधिसुतास्तुतीच्या पते !
भले न वरिति स्तुतिप्रति, न जोडिती पाप ते; ।
गळां पडति ज्यांचिया तव गुणैकदेशभ्रमें,
तिहीं तुजचि दावितां, भजति, बा ! तुला संभ्रमें. ॥ ३२

( कवितासुतासमर्पण. )

म्हणोनि कवितासुता तुज समर्पितों; साजरी
नसे बहुतशी गुणी कनकपीतवासा ! जरी, ।
तरी न इतरा वरी, हरि ! करीं इला किंकरी;
मयूरहि निजात्मजाग्रहविमुक्त, जैसा करी. ॥ ३३
स्मरोनि कृतमंतुला, न कवितावधूस्वीकृती
कराल, तरि आयका प्रभु ! खराच मी दुष्कृती; ।
नमस्कृतिपुरःसर स्वकृति अर्पितों आजि, ती
दिली रविसखें तुह्मां जशि नमोनि सात्राजिती. ॥ ३४
'पिता खळ, परंतु ती गुणवती सती चांगली;
म्हणोनि मज आपुल्या भजनिं लावणें लागली;' ।
म्हणाल, तरि तत्सुखा कशि, ? तुम्हांसवें भांडगा
अहर्निशिहि भांडला त्रिणव रात्र जो दांडगा. ॥ ३५
तिलाहि बरवी म्हणा, उचित होय; तोषाकरें
असेल सजली यथारुचि तयीं स्वयोषा करें, ।
जशी पदरजें शिला; परि असे न हे शापिली
धवें, हरिमनोहराकृति सती अघें व्यापिली. ॥ ३६

१ पाठ भेदः–'समर्पित्या,'

भलें स्मरण जाहलें समयिं, कंसदासी करें
कशी उजरली समुज्ज्वलदयासुधासीकरें ? ।
तुम्हां स्वरिपुची तशी बटिक आवडे, मत्कृती
नको, न सजवे, असा बहुत काय मी दुष्कृती ? ॥ ३७
जशी पृथुकतंदुलप्रसृति आप्तकामा तशी
रुचो कृतिः सभाग्य तूं सुनय आप्त कां मातशी ? ।
कण्या विदुरमंदिरीं म्हणति साधु आस्वादिल्या;
खरें जरि, कशा तुज प्रभुसि आपुल्या स्वा दिल्या ? ॥ ३८
जिणें रस पहावया प्रशिथिलीं रदीं चाविलीं,
सुवासहि कळावया प्रथम नासिकीं लाविलीं, ।
तुम्हांसि शबरी तशीं बदरिकाफळें दे जुनीं,
कथा अशि असो, पहा स्वचरितें तुम्ही मेजुनी. ३९

( शरणागतांविषयीं प्रभूचें कारुण्य. )

प्रभो ! शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे. ।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा ! खरें,
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें. ॥ ४०
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो ! चुकतसों, तरी करिसि तूंचि संरक्षण. ।
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि तीः
रुचे विषय; ज्यां मिळे अमृत, ते न मद्या पिती. ॥ ४१

( 'क्षमस्व' अशी प्रार्थना. )

विपाक न गणोनि म्या प्रकट आपुल्या घातकें.
कळोनि अमितें बळें विविध जोडिलीं पातकें. ।
'क्षमस्व भगवन्नजामिलसखोऽसि' ऐसें तुला
म्हणें नमुनियां सुदुस्तरविपन्नदीसेतुला. ॥ ४२

( भगवत्परीक्षेची वेळ. )

नव्हे अनृत, सत्य तें, अचल ऊचलीला करें
तुवां हरिमदापहें बृहदुदारलीलाकरें. ।
समुद्धरसि एकटा जरि जडासि या कर्दमीं,
म्हणेन भुवनत्रयीं तरि तुला 'भला मर्द' मी, ॥ ४३

( वैद्याचा दृष्टांत. )

चिकित्सक 'भला भला' म्हणुनि फार वाखाणिला,
जरी बहुजनामयद्रुम समूळही खाणिला, ।
तथापि अतिदुःसहस्वगदशत्रुच्या अत्यया-
विना, न हृदयीं धरी सरुज पामर प्रत्यया. ॥ ४४

( स्वोद्धारार्थ उतावीळपणा. )

म्हणा मज उतावीळा; गुणचि घेतला; घाबरें
असो मन असेंचि बा! भजकबर्हिमेघा! बरें. ।
दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें
धरील मन? आधिनें बहु परिभ्रमे चाकसें. ॥ ४५
कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली;
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली. ।
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा;
न हों जरि उतावीळा, स्वरिपु कापितो हा गळा. ॥ ४६

( प्रभूविषयीं काळजी. )

अवश्य करणें खरें प्रणतरक्षण स्वोचित;
उशीर मग कां? बसों कृपण मीहि कां शोचित? ।
नव्हे प्रभुवरा! तुम्हां उचित एकटें धांवणें;
कृतांत शिवला नसे तंव, दिसे बरें पावणें. ॥ ४७
'कसें तरि करूं तुझें अवन; पूरवूं आळ जी
असेल मनिं; आमुची तुज कशास रे काळजी?' ।
असें जरि म्हणाल हो प्रियतमा! जगज्जीवना!
तदाश्रितमृगासि ती सुखसमृद्धि बा! जी वना. ॥ ४८

सुखेंचि सुख बाळका प्रकट होय मातेचिया;
तिला घडति जे श्रम, प्रियजनोत्तमा! तेचि या; ।
म्हणोनि न शिवो पळ क्षणहि कष्ट जीवा! तुला,
विपज्जलधिसेतुला, सकललोकजीवातुला. ॥ ४९

( प्रभूला आयुरर्पण. )

असोत तुज आमुचीं सकल भाविकायुर्बळें[1];
जगोनि बहु काय म्यां सुकृत जोडिलें दुर्बळें? ।
असें प्रियसख्या! सुखी बहुतकाळ; मायातमीं
जना सुपथ दाखवीं; मुदित सत्तमा! यांत मी. ॥ ५०

( देवाचें अत्यंत क्षमाशीलत्व. )

'भले परिशिले सुरासुरनरीं तसे लक्ष मी'
म्हणोत म्हणणार बा! तुज असा नसेल क्षमी; ।
उरीं भृगुपदाहती मिरवितोसि, अद्यापि ती,
कवी तव यशःकथा नवसुधानवद्या पिती. ॥ ५१

( विषयवासनेचें दुर्निवार्यत्व. )

'भवन्मतिस आवडे जरि, धनादिकांलागिं ते
मदीय गुणकीर्तनश्रवण कां तरि त्यागिते? ।'
असेंहि म्हणशील बा! जरि तरी तुझी मावली
तुज त्यजुनि पाजितां, कशि दुधाकडे धांवली? ॥ ५२
अनावर पिशाचिका विषयवासना सत्य, जी
असें करवि कृत्य, जी भुलविते, कधीं न त्यजी; ।
म्हणोन तुज जाणत्या विनवितों, 'इला गोढ[2] गा!
करीन मग, तूं जरी म्हणसि, आपणा गाढ गा.' ॥ ५३
तुझ्या गुणकथा महासुरभि, त्यांत ही रासभी
शिरे विषयवासना; जसि शुका अहीरास भी, ।
तशी न इतरास भी; इस सदंडही हाकिती;
तथापि बहु लाथळी; मग अदंड मी हा किती? ॥ ५४

१ पा. भे. 'भावुकायुर्बळें'; २ पा. भे. 'काढ गा!'

( विषयवासनाक्षयार्थ प्रभुकृपाच समर्थ. )

खरासुर जसा, तशी विषयवासना हे खरी;
हिचा वध करावया तुजच शक्ति आहे खरी; ।
यकी सुमति, ताटका लघु, न हे भली; लाजशी
उगाचि, तशि एक ही; व्रजवनांत लीला जशी. ॥ ५५

कसें तरि असो मग; स्वपणरक्षणाकारणें
अवश्य शरणागतव्यसन तों स्वयें वारणें; ।
तुम्हां विहित मुख्य हें; न पुसतां करा हो! खरी
निजोक्ति; खर काय तो अधिक? संहरा हो! खरी. ॥ ५६

खरी करितसे कशी तव जनींहि सत्ता पहा;
हिचा वध न निंद्य वा! प्रबळ मूर्त सत्ताप हा; ।
'कथासुरभिचा रस स्वहित, पुष्कळ, स्वादुही,'
म्हणे, 'त्यजुनि कां मला निजधना, परखा दुहीं?' ॥ ५७

( कथासुरभीचें अत्यंत कारुण्य. )

कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती;
शिशूंसि जरठांसही निरखितां रसें दाटती; ।
दुहोत भलते सदा, तरि न लेशही आटती;
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती. ॥ ५८

( कथेला सुरभीची उपमा योग्य किंवा कसें? )

कथांसि उपमा दिली सुरभिची, दिसे नीट ती;
परंतु बहु मंद मी, म्हणुनि सच्छ्रुती वीटती; ।
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा शुद्ध तें
नव्हेचि; न विचारिलें बुधजनासि म्यां उद्धतें. ॥ ५९

( प्रभुस्तवनाची आवड व महाजनभय. )

असेंहि उपदेशिती गुरु रहस्य[१] मंदा, 'रुचे
निजस्तव जसा तसा, अगुण घे न वंदारुचें;' ।

१ पा. भे. 'हरिस वंदा,'

म्हणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों,
परंतु हृदयीं महाजनभयास मी मानितों. ॥ ६०
म्हणे–'स्वकृतिच्या उणें किमपि एक वर्णीं न हो;
असें तुज कधीं बरें विगतशंक वर्णीन हो!'–।
असेचि अशि आवडी, करिसि कां न अत्यादर?
स्वभक्तसुरपादपा! हरि! नसेचि सत्या दर. ॥ ६१

('ध्रुवाप्रमाणें प्रसाद करा' अशी विनंति.)

ध्रुव स्तवनिं आवडी धरि, म्हणोनि अत्यादरें
तुम्हीं करुनि दाविली, शिवुनि गल्ल सत्या दरें. ।
तसें मज करा, करांबुज धरा शिरीं, मावरा!
वराभयपरा! पराक्रमपटो! मना आंवरा. ॥ ६२
करांबुज असो; नसे उचित त्यास मी पामर;
प्रणाम करिती पदाप्रतिहि सन्मुनी सामर; ।
पदाब्जरजही जगत्रयनमस्क्रियाभाजन;
प्रसादचतुरा! कसा तरि करा बरा हा जन. ॥ ६३
तुम्ही करुनि दाविला ध्रुव कृतार्थ जैसा दरें,
तसेंचि जरि योजिलें तुमचिया मनें सादरें, ।
असो; विहित तें करा; परि बरोबरी त्यासवें
नसे उचित; तो महाप्रबळ, वंदिजे वासवें. ॥ ६४
किती वय? कसें तप प्रखर? काय विश्वास तो?
ध्रुव ध्रुव खरा स्तवा उचित होय विश्वास तो; ।
कशी तुळितसां तुम्ही प्रकट मेरुशीं मोहरी?
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा, हो! हरी! ॥ ६५

(प्रभुत्व व प्रसाद.)

प्रभुत्व तरि हेंच कीं करुनि दे कृपा दान तें,
स्वसाम्य यदुपार्जनें मिरविजे स्वपादानतें; ।

प्रसाद मग काय तो, जरि निवारिना लाघवा ?
कसें दशमुखानुजा विसरलां ? अहो राघवा ! ॥ ६६

( सत्पात्रीं वरदान. )

असो वरि कसा तरी, विमल भाव ज्याचा, करा
तयावरि दया; पचे वर असाचि द्या चाकरा; ।
वृथाचि गमतें दिलें, बहुहि, जें न दासा जिरे;
पुसोनि अधिकार द्या; सुकर ते सदा साजिरे. ॥ ६७

( कुपात्रीं वरदान-वृकासुरकथा. )

प्रसन्न बहु होतसां, परि कराल हो ! बावरें
शिवापरि वरासवें हृदय, हें न हो बा ! वरें; ।
असा वृक कृतघ्न हें न कळलें कसें हो ! हरा ?
भला जगविला तुम्हीं भवमहाहिचा मोहरा. ॥ ६८

( सत्पात्रीं वरदान-उपमन्युकथानक. )

भजे सुदृढनिश्चयें द्विजकुमारक क्षीरधी,
तया करिं तुम्हीच द्या मदनमारक ! क्षीरधी; ।
उदारपण तें बरें, सुखवि जें सुपात्रा सदा;
दिलें अमृत पन्नगा, तशि खळीं कृपा त्रासदा. ॥ ६९

( शंभो ! दया कर. )



अतिप्रिय, सुखप्रद, प्रथम तूं मुदंभोद या
मयूरहृदया; तुझी क्षण विटो न शंभो ! दया; ।
उदारपण वानिलें; अजि ! गुरूपहासा बळें
कसें करिल लेंकरूं ? निपट हें पहा सावळें. ॥ ७०

( हरिहरांचें अभिन्नत्व. )

तुम्हां हरिहरांत ज्या दिसतसे, दिसो; 'वास्तव'
प्रबुद्ध म्हणती 'नसे तिळहि भेद;' मी यास्तव ।
म्हणें मनिं, 'यथार्थ जें स्वमत वर्णिती शैव तें
न; वैष्णव दुराग्रही; परम मुख्य हीं दैवतें.' ॥ ७१
म्हणें क्षण पुरांतक, क्षण मुरांतक; ब्राह्मणा
मला जरि म्हणाल बा ! तरि विशंक लुब्रा म्हणा; ।
तुम्हां शिव, शिवा तुम्ही भजतसां; शुक, व्यास हा
सदर्थ वदले; पुरातन कथा, न नव्या, सहा. ॥ ७२

( व्यासस्तवन. )

तुझाचि अवतार तो सुत पराशराचा; वळे,
तदुक्तिस जन; प्रभो ! जरि निजेमधें चावळे ।
तरि, त्रिभुवनेश्वरा ! तव विशुद्ध नामावली
मुखीं प्रकट होय, जी करि सुखी जना मावली. ॥ ७३

( भगवन्नाममाहात्म्य. )

तुझें कुशळ नाम बा ! हळुहळू मना आकळी;
दुरत्यय असा महा खळहि त्यास भी हा कळी; ।
हरि व्यसन पाप हें बहु कशास ? कायाधवा-
परि त्वरित भेटवी तुजहि, योगमायाधवा ! ॥ ७४
तुम्हांसमचि हें गुणें; अणु उणें नसे नाम; हा
दिसे अधिकही, तसा गुण तुला असेना महा; ।
सदैव भलत्यासही सुलभ; आणखी गायका
छळी न, न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ! ॥ ७५

( बळीभक्ताचा छळ व त्याची सहनशीलता. )

छळीं नृप बळी बळी, तरिच तो नसे आटला;
गमे बहु भला मला न, सकळांसही वाटला;

परीक्षक करी, तसें जडहि सोशितें हेमही;
न केवळ विरोचनात्मज तरे पदें, हे मही. ॥ ७६

( भक्तच्छळाची आवश्यकता. )

असा न करितां जरी छल, तरी प्रभो ! तो भली
सुकीर्ति कशि पावता कविसभा जिणें शोभली ? ।
पदीं उपजती नदी कशि ? कशी त्रिलोकी सती
अशा अतुल मौक्तिकावलिविणें बरी दीसती ? ॥ ७७

( छळ सोसण्याविषयीं कवीचें असामर्थ्य. )

नको छळ; अधीर मी; तशि न कीर्ति हो; चामरें
नृपासि उचितें; वृथा, मिरविलीं जरी पामरें; ।
अकीर्तिच असो, रुचे तुज कशी व्रजीं कांबळी ?
असें न समजा कसें ? वरिल हारिला कां बळी ? ॥ ७८

छळाल कृपणासि कां ? अजि ! दयानिधे ! कांपिती
भटासि भट संगरीं, परि न कातरा दापिती; ।
कराल तितुकी कृपा बहु; अहो ! शरण्या ! तमीं
बुडोनि शरणागत श्रमतसें अरण्यांत मी. ॥ ७९

( रामावतारस्मरण-रामवनवास. )



मुखासि जंव पातलीं ‘श्रम,’ ‘अरण्य’ ऐशीं पदें,
निजस्मृतिसि जाहलीं विषय तीं तव श्रीपदें,
गुरूक्तिस करावया सफळ, जानकीजीवना!
धरासुरतपःफळें त्वरित धांवलीं जीं वना. ॥ ८०

( ‘सीतेप्रमाणें मजवरही दया करा’ अशी प्रार्थना. )

तयीं प्रभुवरा! तसे सदय; कां असे? आज हो!
विचारुनि पहा बरें निजमनीं महाराज! हो!।
वनोवनिं फिरा पिशापरि; म्हणा अहोरात्र ‘हा’!
नसे कुशळ भाषणीं, परि असे कृपापात्र हा. ॥ ८१

समागम तुझा घडो म्हणुन जाहले लाकडें
तपोनळिं, तसे मुनि त्यजुनि, जोडिलीं माकडें;।
अयुक्त बहु ज्या जनास्तव घडे, पडे सांकडें,
तदुक्तिहुनि आमुचें बहुत बोलणें वांकडें? ॥ ८२

‘जगत्त्रयमनोहरा! बलगुणैकरत्नाकरा!’
म्हणें ‘कनकरंकु द्या मज, महा प्रयत्न करा.’।
प्रियाहि अशि जाहली तुज कुकार्य आज्ञापिती;
सुधा त्यजुनि कामुक प्रकट अंगनाज्ञा पिती. ॥ ८३

स्वदास समयीं जपे, तरि न दे वरा, चाकरी
चुके न, परि सार्थक श्रम न देवराचा करी;।
वदेहि भलतेंचि; तें तिसचि, कोप टाका, पुसा;
असें मृदु, म्हणोनि बा! मज न धोपटा कापुसा. ॥ ८४

( आवड गोड—कृष्णावतारकथा. )

न जें प्रिय, सदोष तें; प्रिय सदोषही चांगलें.
स्वतोक पितरां रुचे, जरिहि कर्दमीं रांगलें.।

१ पा. भे. ‘तपोनिधि;’

तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ?
जरी मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें. ॥ ८५
तुझे कथिति गोपिका विविध तीस बोभाट, ते
सुखप्रद गुणस्तवापरिस जाहले वाटते; ।
क्षमा न करि एकदा, तरिहि फार खोडी करां;
न देचि भय, ताडनोद्यमसमेत सोडी करां. ॥ ८६
जरी म्हणसि बांधिलें, तरि न कष्टवीलें; करा
विचार, जशि कष्टवा तशि न कष्टवी लेंकरा; ।
यथेष्ट पुरतें जरी प्रथम दाम, कां सांधिती ?
न ती प्रबळ गोपिका; तुज तुझी दया बांधिती. ॥ ८७

(भगवन्निष्ठुरता क्षणिक व केवळ भक्तकल्याणार्थ असते.)

तुम्हींहि बळि बांधिला म्हणुनि आमुची माय जी
मनांत सहजा दया, निपट टाकिली काय ? जी ! ।
सकोप दिसती गुरु क्षणभरीच; जें तापलें
जल ज्वलनसंगमें, त्यजि न शैत्य तें आपलें. ॥ ८८

(भगवंताची सदयता.)

प्रसिद्ध तुमचे महासदय पाय; जीवांकडे
चुकी, म्हणुनि होतिल क्षणहि काय जी ! वांकडे ? ।
न निष्ठुर पिता; म्हणे मनिं 'न हो प्रजा टोणपी;'
अपथ्यरुचि रुग्ण तो कटुक ओखदें कोण पी ? ॥ ८९
असंख्य खळ संगरीं निजकरीं तुवां मारिले;
न निष्ठुरपणें, कृपा करुनि ते भवीं तारिले; ।
जगज्जनक तूं, मुलें सकळ जीव, यां भातुकें
दटावुनिहि देशि बा ! अमृत नेदिजे घातुकें. ॥ ९०

वरी प्रकट शांतिला धरि, परंतु मीना बकी
गिळी; तशि तुला टपे सुकृतबुद्धिहीना बकी; ।
जिणें गरळ पाजिलें, अमृत पाजिलें तीस तां;
खळासि न दिसो भलेपण, खरे भल्या दीसतां. ॥ ९१

( देवच खरा सदय पिता. )

सदाहि हित नायकों; बहु अपाय केले, करूं;
तरी सकृप बाप तूं म्हणसि, 'नायके लेंकरूं;' ।
कधीं न करिसी प्रभो ! भजकबाळकोपेक्षण;
न तूजवरी ज्यापरी पशुपपाळ कोपे क्षण. ॥ ९२
खरा जनक तूं, जनां इतर कोण हो ! देव वी ?
समीहित फळें जगा तव पदाब्ज दे, देववी; ।
अशीच करुणा असो हरि ! कधीं न भंगो पिता;
अशा मज असाधुला इतर कोण संगोपिता ? ॥ ९३
सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी
प्रपंच, भर घे शिरीं, करि कृपा पिता त्यावरी; ।
असा जरि नसे, रुचे तरि न तो अभद्र क्षण;
तसा तुजचि आवडे; करिसि तूंचि तद्रक्षण. ॥ ९४

( मातृमहिमा. )

पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्रीं विटे;
दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे; ।
प्रसादपट झांकिती परि परा गुरूचे थिटे;
म्हणूनि म्हणती भले 'न रिण जन्मदेचें फिटे.' ॥ ९५

( भगवत्कृपा हीच खरी माता. )

विटेल जननीहि कीं शत रची निमित्तें विधी;
मळे कलियुगीं श्रुती जशि, खळीं तिची तेंवि धी ।

कदाचित विटेल; बा! तव दया न दीनावरी;
जशी जगदघक्षयीं कर भवन्नदी नावरी. ॥ ९६
कृपाचि जननी तुझी; सकल जीव दायाद; या
तिणेंचि उपदेशिल्या करिति सर्व दाया दया; ।
असें उमजतां भले न गुरुभाव तो टाकिती;
मता तुजहि गोपिका, मग जनास तोटा किती? ॥ ९७

( देवाची कृतज्ञता. )

भरोनि कुचकुंभ जी विषरसें मुखीं दे बकी,
प्रभो! तिसहि ठेविशी, जशि महासुखीं देवकी; ।
न होति जननी कशा पशुपदार, गाई? लया
न पावतिच तत्सुखें, कृति न कोण गाईल या? ॥ ९८



अशी तरि कृतज्ञता हरि! तुझ्याच ठायीं अगा!
सख्या! अणुचि मानिशी, करुनि सुप्रसादा अगा! ।
भुले सुकविवाग्वधू[1] तव गुणा अनर्घ्यानगा;
म्हणेल जन कोण, कीं यश पुनःपुन्हां तें न गा? ॥ ९९
तुम्ही बहु भले, मला उमज होय ऐसें कथा;
कसा रसिक तो? पुन्हां जरि म्हणेल आली कथा; ।
प्रतिक्षण नवीच दे रुचि, शुकाहि संन्यासिया;
न मोहिति भवत्कथा अरसिका अधन्यासि या. ॥ १००

१ पा. भे. 'सुकवितावधू'.

( भगवत्कथाप्रशंसा. )

कथा श्रवणचत्वरीं जरि पुनःपुन्हां ये, रते
महारसिक तद्रसीं, विटति ऐकतां येर ते; ।
विलोकुनि विलासिनीजन पुनःपुन्हां कामुका
करी वश; नव्हे बुळा, विवश घेइना कां मुका ! ॥ १०१



कथा सुपुरुषा तुझी वश तशी करी, राधिका
जशी तुज, जिला स्वयें म्हणसि तूं शरीराधिका; ।
तिचें न घडतां, रमाहृदयवल्लभा ! सेवन
प्रभो ! तुज जसें, तसें मतिस गेह भासे वन. ॥ १०२

( कथा मोहिनीपेक्षां श्रेष्ठ. )

कथा भुवनमोहिनी, अशि न मोहिनी होय ती;
हरो असुरधी; हिणें भुलविले किती हो ! यती; ।
नव्हे न म्हणवे; असो; जरि विमोहिला दक्षहा,
प्रिया बसविली शिरीं, मुनिपथीं कसा दक्ष हा ? ॥ १०३
सुरासुरनरोरगां भुलवुनी कथा न त्यजी;
न भेद करि पंक्तिचा; अमृत पाजिती सत्य जी; ।
तिणें जरि सुधारस स्वरतमानसां पाजिला,
वधी अमृत घोटितां, द्रव नयेचि बापा ! जिला. ॥ १०४
अभीष्ट वरितात, जे तव कथेसि विश्वासती;
भली असुरवंचनी, श्रुत असेचि विश्वास ती; ।

SURESH V. RANADE PERSONAL LIBRARY 5783

कथा कशि सखी तिची ? ठकवुनी हरी संचितें,
तरी अमृत दे, असें सदय, दाखवी वंचितें. ॥ १०५

( कथेची वंचना भक्तकल्याणार्थ. )

करा श्रवण येवढें, अपटु लोक हांसो मला;
अहो ! जरि गिळावया प्रियकुमार घे सोमला, ।
तयासि ठकवूनि दे बहुत शर्करा माय जी,
तिला स्वशिशुवंचनें अदयता शिवे काय ? जी ! ॥ १०६

म्हणोनि बहु मोहिनीहुनि भली कथा हे तुजी,
अभीष्ट फल द्यावया नतमनोरथां हेतु जी; ।
म्हणाल जरि 'मीच त्या, विषम काय दोघींत रे ?
जसा जन सितासिताभिधनदीसदोघीं तरे'. ॥ १०७

अहा ! बहु विशुद्ध हे प्रभु ! तव स्वरूपाहुनी;
न भिन्नतनु त्या; भले भजति, एकता पाहुनी; ।
परंतु वदतों जनानुभव, नातळो पाप गा !
तशी न यमुना गमे, जशि गमे, निर्लिंपापगा. ॥ १०८

( गंगावर्णन. )

जगद्गुरुमहेश्वरप्रभुशिरीं जिचें नांदणें,
तिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें,
प्रजा हरिहरां अशा यदुदरीं अनेका; कवी
भिऊनि म्हणतील कां 'जशि सुधा तशी काकवी'? ॥१०९

( मोहिनीची यमुनेशीं व गंगेची कथेशीं तुलना )

तुला स्वयमुनेसवें, कुवलयद्युतिश्यामला !
म्हणाल जरि मोहिनी निजतनू, अवश्या मला; ।
तुलीन अमृतोदधिप्रभवपुंडरीकामला
कथा सुरधुनीसवें, सुजन जींत विश्रामला. ॥ ११०

( कथा अतुला व निरुपमा-भागवताची व गुरूची साक्ष. )

शुकोदित पुराण ज्या श्रवण सन्मुखें साग्रही,
म्हणेल 'अतुला कथा' झणिं म्हणाल, 'तो आग्रही;' ।
न केवळ मलाचि हे निरुपमा, यशोमंडिता,
गुरूसहि गमे, पुसा स्ववरदा महापंडिता. ॥ १११

( भगवत्कथा मोहिनीपेक्षां श्रेष्ठ—आणखी एक कारण. )

प्रभो ! तुज न मोहिनी भुलवि; मोहिला तोहि ती
त्यजी जन; नव्हे तशी, तुज तुझी कथा मोहिती; ।
निजानुभव तूं पहा; जशि महौषधी पारदा,
तुला स्थिर बळें करी, कळविलें तुवां नारदा. ॥ ११२

( प्रभूची स्वकथासक्ति. )

सुरर्षिजवळीं स्वयें वदसि, 'तत्र तिष्ठामि;' या
तुझ्याचि वचनें म्हणें तुज 'कथावश' स्वामिया ! ।
जसा स्थिर कथेंत तूं, स्थिर करीं तसें या मना;
स्वभक्तसुरपादपा ! सफळ हे असो कामना. ॥ ११३

( भगवद्गुणवर्णनाची नारदाला आवड. )

सुरर्षि म्हणतो, 'तुझें यशचि धन्य; यो गायना
मला; कवि म्हणोत ते सुखद अन्ययोगायना;' ।
विमुक्तिबहुसाधनें तदितरें गणीनाच तो;
सजूनि वरवल्लकी तव सभांगणीं नाचतो. ॥ ११४

( भगवत्कथामाहात्म्य-देवर्षि नारदाचा अनुभव. )

तुझें चरित सन्मुखें श्रवण जाहलें, यास्तव
प्रजापतिसुतत्व ये, करिति साधु ज्याचा स्तव; ।
स्वनीचपण मागिलें, बहु दया अशी नारदा
सरे घडिघडि, प्रभो ! भवपयोधिच्या पारदा ! ॥ ११५

(सत्संगतिमहिमा.)

तुझें यशचि तारितें, परि न केवळा तारवे;
सहाय असिला असे, तरिच शत्रुला मारवे; ।
न भागवत भेटतां, न घडतांहि सत्संगती,
न अज्ञहृदयें, तशीं तव यशोरसीं रंगती. ॥ ११६

(नौकेचा दृष्टांत.)

बुडे, बुडवि सागरीं तरि, सुकर्णधाराविना; ।
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना; ।
सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी,
तयींच उतरी भवोदधितटीं जनां लौकरी. ॥ ११७

(वरप्रसादयाचना.)

सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो; ।
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन, भवच्चरित्रीं जडो. ॥ ११८


न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो. ॥ ११९

मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकल कामना, मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासांवरी,
तशी प्रकट हे निजाश्रितजनां सदा सांवरी. ॥ १२०

( स्वोद्धारार्थ मयूराची दयाघन परमेश्वरास अखेरची प्रार्थना. )

दयामृतघना ! अहो हरि ! वळा मयूराकडे;
रडे शिशु, तयांसि घे कळवळोनि माता कडे; ।
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा ! कदा सांपडे ?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे. ॥ १२१

( उपसंहार-उपास्यदेवता श्रीरामाचें मांगल्यसूचक सप्रेम स्मरण. )



कारुण्यांभोद राम प्रियसख गुरुही जो मयूरा नटाचा,
होतां तापत्रयार्त त्वरित भववनीं रक्षिता रानटाचा, ।
त्याचें साचें स्वभद्रस्मरण, मग न तें त्या कसें ये कवीस ?
केका, एका सख्यातें स्मरुनि, करि अशा एकशें एकवीस. १२२

* श्रीराम जयराम जयजयराम *

SURESH V. RANADE, Pune
5783
PERSONAL LIBRARY